क्रमांक :- पीडब्ल्यूडी-४२१७/सीआर-४२/२०१७/तीन दिनांक १० जुलै, २०१७

## -- विकलांग उमेदवारांना सूचना --

शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.१, दिनांक १८ मार्च, २०१४ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार विकलांग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ लेखनिक व अन्य बाबींसंदर्भात आयोगामार्फत आयोजित विविध परीक्षांकरीता व्यवस्था करण्यात येते. यासंदर्भात संबंधित विकलांग उमेदवारांचे खालील बाबींकडे लक्ष वेधण्यात येत आहे:-

(१) **फक्त दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार उत्तरे लिहिण्यास सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ लेखनिक/अनुग्रह कालावधी देय आहे. कर्णबधीर उमेदवारांना लेखनिक/अनुग्रह कालावधी अनुज्ञेय नाही.**

(२) विकलांग उमेदवारांपैकी कर्णबधीर उमेदवार वगळता इतर उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास लेखनिक वापरत नसला तरी त्यास प्रत्येक तासाला अतिरिक्त २० मिनिटे वेळ अनुज्ञेय आहे. **कर्णबधीर उमेदवारास अतिरिक्त वेळ अनुज्ञेय नाही.**

(३) लेखनिकाची मदत घेणा-या अथवा लेखनिकाची मदत न घेता अनुग्रह कालावधीची मागणी करणा-या उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील व कायमस्वरुपी किमान ४०% विकलांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

(४) परीक्षेच्या वेळी विहीत मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र व त्याची छायांकित प्रत सादर न करणा-या उमेदवारांना लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी दिली जाणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय नाही.

(५) परीक्षेच्या वेळी लेखनिकाने स्वत:चे मूळ ओळखपत्र (आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक) व त्याची छायांकित प्रत तसेच स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो आणणे बंधनकारक आहे.

(६) एखाद्या उमेदवाराकडून लेखनिक अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरवितांना त्या उमेदवारास प्रत्यक्षात लेखनिकाची अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता आहे काय, याची तपासणी करण्यात येईल. अपात्र उमेदवाराला लेखनिक अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

(७) **सरसकट सर्वच विकलांग उमेदवारांना अनुग्रह कालावधी अनुज्ञेय नाही.** लेखनिकाची मदत घेण्यासाठी अथवा लेखनिकाची मदत न घेता अनुग्रह कालावधीसाठी आयोगाने परवानगी दिलेल्या उमेदवारांनाच अनुग्रह कालावधीकरीता पात्र समजण्यात येईल.

(८) परीक्षेच्या वेळी आवश्यक कागदपत्रासह विहित विवरणपत्र सादर करणा-या उमेदवारांनाच लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी देण्यात येईल अथवा अनुग्रह कालावधीसाठी पात्र समजण्यात येईल.

(९) विकलांग उमेदवारांकडून विहित विवरणपत्र भरुन घेण्याकरीता तसेच त्यांच्या मूळ वैद्यकीय प्रमाणपत्राची तपासणी करण्याकरीता विकलांग उमेदवारांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान एक तास अगोदर परीक्षा उपकेंद्रावर हजर राहणे व संबंधित उपकेंद्रप्रमुखांची भेट घेणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

सुनिल अवताडे

ठिकाण :- मुंबई उप सचिव

महाराष्ट्र लोकसेवा आयोग